# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./२६६७/२०१८ | दि. ०८/०८/२०१८

## परिपत्रक

विषय :- रस्ता सुरक्षेचे दृष्टीकोनातुन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा समुपदेशन व महाविद्यालयात शिकावू वाहनचालक अनुज्ञप्ती देण्याची योजना कार्यान्वीत करण्याबाबत.

संदर्भ :- मा. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयीन परिपत्रक क्र. पआ/का.११/संगणक/ एलएलआरटॅब/२०१८/जा.क्र. ११६३१, दिनांक ०२ ऑगष्ट्र २०१८

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ व विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, विद्यार्थी ये जा करण्यासाठी बहुश: दुचाकी वाहनांचा मोठया प्रमाणावर वापर करतात. तथापि, अशा विद्यार्थ्यांना बहुदा सुरक्षित वाहन चालविण्याची मुलतत्वे, नियम, वाहतुक चिन्हे याबाबत माहिती नसते इतकेच नव्हे तर त्यांचेकडे नियमानुसार वाहनचालक अनुज्ञप्ती(लायसेन्स) ही नसते. अशा विद्यार्थ्यांमुळे रस्ता सुरक्षा व त्यांची वैयक्तिक सुरक्षाही धोक्यात येवू शकते. विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षित वाहन चालविण्याबददूल जागरूकता निर्माण व्हावी व त्यासोबत त्यांचे महाविद्यालयातच इच्छुक विद्यार्थ्यांना वाहनचालक शिकावू अनुज्ञप्ती प्राप्त व्हावी या उद्देशाने परिवहन विभागाने योजना तयार केली असून, त्याअंतर्गत परिवहन विभागाचे स्थानिक अधिकारी महाविद्यालयात संपर्क साधून, महाविद्यालयांच्या प्राचार्य व कर्मचारी यांचे मदतीने सदर कार्यक्रम महाविद्यालयात राबवितील असे संदर्भीय पत्रान्वये निर्देशीत केले आहे..

त्याअनुषंगाने रस्ता सुरक्षा वृध्दिंगत करण्याच्या परिवहन विभागाच्या प्रयत्नांना हातभार लावण्यासाठी आपल्यास्तरावर आवश्यक कार्यवाही घ्यावी.

**(डॉ. गो. दा. दुबे)**
**कुलसचिव(प्र.)**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

सहपत्र - संदर्भीय पत्र संलग्नित.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता अग्रेषीत.
३) मा. विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

शेखर चन्ने
परिवहन आयुक्त

दूरध्वनी क्र. : ०२२-२६५१ ६३ ३६
फॅक्स क्र. : ०२२-२६४१ ४९ ०१
ई-मेल : tcmaharashtra@yahoo.com
अ. शा. पत्र क्र. /कार१/संगणक/एलएलआरटेब/२०१८/जा.क्र. 11631
परिवहन आयुक्त यांचे कार्यालय
४ था मजला, प्रशासकीय इमारत, चेतना कॉलेजजवळ
शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१

दिनांक : 2 AUG 2018

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 3415 दि. 6.8.18
जावक क्र.......... दि..........

6523 6.8.18

**विषय** - रस्ता सुरक्षेचे दृष्टीकोनातुन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा समुपदेशन व महाविद्यालयात शिकाऊ वाहनचालक अनुज्ञप्ती देण्याची योजना कार्यान्वीत करण्याबाबत.

आदरणीय महोदय,

आपणास विदित आहेच की, महाविद्यालयीन विद्यार्थी ये जा करण्यासाठी बहुश: दुचाकी वाहनांचा मोठया प्रमाणावर वापर करतात. तथापि, अशा विद्यार्थ्यांना बहुदा सुरक्षित वाहन चालविण्याची मुलतत्वे, नियम, वाहतुक चिन्हे याबाबत माहिती नसते इतकेच नव्हे तर त्यांचेकडे नियमानुसार वाहनचालक अनुज्ञप्ती (लायसेन्स) ही नसते. अशा विद्यार्थ्यांमुळे रस्ता सुरक्षा व त्यांची वैयक्तिक सुरक्षाही धोक्यात येवू शकते.

विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षित वाहन चालविण्याबद्दल जागरुकता निर्माण व्हावी व त्यासोबत त्यांचे महाविद्यालयातच इच्छुक विद्यार्थ्यांना वाहनचालक शिकाऊ अनुज्ञप्ती प्राप्त व्हावी या उद्देशाने परिवहन विभागाने योजना तयार केली असुन, त्या अंतर्गत परिवहन विभागाचे स्थानिक अधिकारी महाविद्यालयात संपर्क साधुन, महाविद्यालयाच्या प्राचार्य व कर्मचारी यांचे मदतीने सदर कार्यक्रम महाविद्यालयात राबवितील. या योजनेचा तपशील अवलोकनार्थ सोबत जोडला आहे.

याकामी आपल्या अधीनस्त सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्यांना सदर योजनेत सहकार्य करुन रस्ता सुरक्षा वृध्दिंगत करण्याच्या विभागाच्या प्रयत्नांना हातभार लावण्यासाठी सूचना द्याव्यात ही विनंती आहे.

आपला स्नेहांकित

शेखर चन्ने

प्रती,
डॉ. नामदेव व्यकंटराव कल्याणकर
कुलगुरु (Vice Chancellor),
गोंडवाना विद्यापीठ,
एमआयडीसी रोड,पोलीस कॉर्ट्रस् रोड,
गडचिरोली. -४४२६०५